| | |
|---|---|
| दाखल तारीख | २३.०१.२०२५ |
| नोंदणी तारीख | २३.०१.२०२५ |
| निकाल तारीख | १८.०४.२०२६ |
| कालावधी | ०१वर्षे,०२म.,२७दि |

**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क.२३** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कारंजा घा. यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- दिक्षा दि. विघ्ने | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क. ८११/२०२४<br>पोलिस ठाणे कारंजा घा. |
| न्यायनिर्णयाची तारीख | १८/०४/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्रमांक ०७/२०२५** |
| | CNR No. MHWR090000692025 |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे कारंजा घा., |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती एम. एस. चांदोरे**<br>(विशेष सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | **१. प्रफुल श्रावण टिपले,**<br>वय- २१ वर्षे, धंदा- मजुरी,<br>**२. चेतन श्रावण टिपले,**<br>वय- २३ वर्षे, धंदा- मजुरी,<br>**३. तन्मय छत्रपती देवासे,**<br>वय- १८ वर्षे, धंदा- मजुरी,<br>सर्वे रा. वार्ड क.१५, इंदिरा नगर,<br>ता. कारंजा घा., जि. वर्धा. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. डी. जी. तहेटवार,**<br>(बचाव पक्षातर्फे वकील) |

**भाग 'ब'**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८.१२.२०२४ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०८.१२.२०२४ |

| | |
|---|---|
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २३.०१.२०२५ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | ०२.०४.२०२६ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०२.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | १८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १८.०४.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रफुल श्रावण टिपले | अटक करण्यात आली नाही. | दिनांक २०.०२.२०२६ | भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ११५(२) सहकलम ३(५) अन्वये | निर्दोष मुक्त | -- | --- |
| २. | चेतन श्रावण टिपले | अटक करण्यात आली नाही. | दिनांक २०.०२.२०२६ | भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ११५(२) सहकलम ३(५) अन्वये | निर्दोष मुक्त | -- | --- |
| ३. | तन्मय छत्रपती देवास | अटक करण्यात आली नाही. | दिनांक २०.०२.२०२६ | भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ११५(२) सहकलम ३(५) अन्वये | निर्दोष मुक्त | -- | --- |

**भाग 'क'**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | यश वासुदेव घाटोडे (निशाणी २०) | फिर्यादी |

**ब. <u>बचाव पक्ष</u> :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

क. **न्यायालयातर्फे** :

| कमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने निशाणीबध्द दस्तांची यादी**

अ. **अभियोग पक्ष** :

| अ.क. | निशाणी कमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी **पी-२१**/सा.क.१ | पोलीस रिपोर्टवरील सही |
| २ | निशाणी **पी-२२**/सा.क.१ | छापील प्रथम खबर अहवालवरील सही |

ब. **बचाव पक्षातर्फे** :

| अ.क. | निशाणी कमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

क. **न्यायालयातर्फे** :

| अ.क. | निशाणी कमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

ड. **महत्वाच्या सुचना** :

| अ.क. | महत्वाची वस्तु कमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | -- |

**न्यायनिर्णय**
**(आज दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी घोषीत)**

आरोपींविरूध्द भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ११५(२) सहकलम ३(५) अन्वये नुसार शिक्षापात्र अपराधासाठी संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की, दिनांक ०८.१२.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजताच्या दरम्यान संताजी महाराज यांची कारंजा गावात रॅली निघाली होती. त्या रॅलीमध्ये फिर्यादी व त्याचा मित्र प्रेम वंजारी याचे सोबत रॅलीमध्ये नाचत होतो. तेव्हा त्या रॅलीमध्ये आरोपी नामे प्रफुल टिपले, तन्मय टिपले व चेतन टिपले

सर्व रा. इंदिरा नगर, कारंजा घा. असे दुधे हॉस्पीटल समोर मेन रोड कारंजा घा. येथे नाचत होते. त्यांनी फिर्यादीला नाचतांना पाहुन जुण्यावादाचे कारणावरून त्याचे जवळ आले व त्याला धक्का बुक्की करू लागले. त्यावेळी फिर्यादीने त्यांना तुम्हांला कशाला मला धक्का बुक्की करत आहे असे म्हटंले असता त्यावेळी आरोपी तन्मय देवासे याने त्याचे हातातील कडा काढुन फिर्यादी यश घाटोडे याच्या कपाळावर मारले तसेच आरोपी प्रफुल टिपले व चेतन टिपले यांनी फिर्यादीला हाता बुक्यांनी मारहाण केली. त्यामुळे फिर्यादी याने आरोपींविरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली. फिर्यादीच्या फिर्यादवरून आरोपींविरूध्द भा.न्या.सं. चे कलम ११८(१), ११५(२) सहकलम ३(५) अंतर्गत अपराध क्र.८११/२०२४ नोंद करण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासा दरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षदारांचे बयाण नोंदवले, आरोपींना सुचनापत्र देवून सोडले. आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्या विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपी न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर आरोपींविरुध्द नि.क्र.१५ वर दोषारोप निश्चीत केले. सदर दोषारोप आरोपींना वाचुन व समजावुन सांगीतले असता त्यांनी नि.क्र.१६ ते १८ अन्वये गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन संपरिक्षा पुढे चालु ठेवण्याची विनंती केली. अभियोग पक्षातर्फे पुरावा नोंदवुन झाल्यानंतर आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न मिळुन आल्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ अन्वये आरोपींचे जबाब नोंदविण्यापासुन सुट देण्यात आली.

४. अभियोग पक्षातर्फे विदवान सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एम. एस. चांदोरे आणि बचावपक्षाचे विदवान वकील श्री डी. जी. तहेटवार यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपींविरुध्द ठेवलेल्या दोषारोपावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असुन मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय की, दिनांक ०८.१२.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजताच्या दरम्यान मौजा दुधे हॉस्पीटल, कारंजा घा. येथे आरोपींनी संगणमत करून फिर्यादी याला जुन्या वादावरून हातातील लोखंडी कडा या घातक शस्त्राचा वापर करून कपाळावर मारून तसेच हाता बुक्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पाहोचवली व त्याद्वारे भा.न्या.सं. चे कलम ११८(१) सहकलम ३(५) नुसार शिक्षापात्र असलेला अपराध केला? | **...नाही...** |

| | | |
|---|---|---|
| **२.** | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय की, दिनांक ०८.१२.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजताच्या दरम्यान मौजा दुधे हॉस्पीटल, कारंजा घा. येथे आरोपींनी संगणमत करून फिर्यादी याला हाता बुक्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पाहोचवली व त्याद्वारे भा.न्या.सं. चे कलम ११५(२) सहकलम ३(५) नुसार शिक्षापात्र असलेला अपराध केला? | **...नाही...** |
| **३.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता :-</u>**

५. वरील मुद्दे सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकमेव साक्षदार फिर्यादी याला तपासले. साक्षदार क्र.१ फिर्यादी असून हा प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहे. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात असे सांगीतले आहे की, तो न्यायालयात हजर आरोपी क्र.१ ते ३ यांना ओळखते. फिर्यादी व आरोपींमध्ये वाद झाला होता. त्यामुळे त्याने तक्रार दिली होती व या व्यतिरीक्त काहीही घडले नव्हते. तसेच त्याने पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या रिपोर्टवर तसेच छापील प्रथम खबर अहवालवर काय लिहीले आहे हे त्याला माहित नसल्याचे सांगीतले. सदर साक्षदार अभियोग पक्षाला साथ देत नसल्यामुळे भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम १५४ नुसार सुचक प्रश्ने विचारण्यात आली. त्यामध्ये सुध्दा त्याने सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

६. सदर प्रकरणामध्ये आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी साक्षदार यांची साक्ष महत्वाची असते. परंतू सदर प्रकरणातील फिर्यादी याने त्याच्या पुराव्यामध्ये आरोपींविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा दिला नाही. त्यामुळे आरोपींविरूध्द कोणताही गून्हादर्शक पुरावा आलेला नाही. सदर प्रकरणामध्ये फिर्यादीला मारहाण केल्याची तक्रार दिल्याचे दिसून येते. परंतू त्याने त्याच्या पुराव्यामध्ये तो चक्कर येवून खाली पडल्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागला होता असे सांगितले. यावरून असे दिसते की, फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये आरोपींविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा दिलेला नाही. जेव्हा फिर्यादी स्वत: आरोपी विरूध्द गुन्हा दर्शक पुरावा देत नाही अशा वेळेस ईतर साक्षदारांना तपासण्यासाठी प्रकरण प्रलंबित ठेवणे न्यायोचित होणार नाही.

७. अभिलेखावरील वरीलप्रमाणे अभियोगपक्षाच्या पुराव्याच्या अवलोकनावरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा दिसुन येत नाही. त्यामुळे पुराव्या अभावी आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द होत नाही. परिणामी, आरोपी त्याच्याविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मी मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी क.१ प्रफुल श्रावण टिपले, आरोपी क.२ चेतन श्रावण टिपले व आरोपी क.३ तन्मय छत्रपती देवासे यांना भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१) सहकलम ३(५) च्या दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपी क.१ प्रफुल श्रावण टिपले, आरोपी क.२ चेतन श्रावण टिपले व आरोपी क.३ तन्मय छत्रपती देवासे यांना भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२) सहकलम ३(५) च्या दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

३) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्रे व जामीनदाराचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

४) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८५ अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपील अगर इतर बाबीसबंधी हजर राहणे कामी प्रत्येकी १५,०००/- रुपयेचे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रकमेचे जामीनपत्र दाखल करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत करण्यात येते.)**

DIKSHA DINESH VIGHNE
Digitally signed by DIKSHA DINESH VIGHNE
Date: 2026.04.18 16:23:05 +0530

(दिक्षा दि. विघ्ने)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा घा.

दिनांक: १८.०४.२०२६